## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(विद्या विभाग)**

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


दिनांक: १८/ ९/२०१८

क्र./विद्या/प्रवेश/२०१८/ ८१९

# :: अधिसूचना ::

सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाव्दारे निर्गमित अधिसुचना क्र. विद्या/Acad./Acad.Cale/2018/571 दिनांक २६ एप्रिल २०१८ अन्वये, संचालित महाविद्यालये, शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याची अंतिम तिथि वार्षिक पद्धतीकरिता (Annual Pattern) व सत्र पद्धतीकरिता (Semester Pattern) **दिनांक ६ ऑगस्ट, २०१८** पर्यंत होती.

काही अपरीहार्य कारणास्तव जे विद्यार्थी विहित तारखे पर्यंत महाविद्यालयात प्रवेश घेवू शकले नाही अशा विद्यार्थ्यांना मा. कुलगुरूंच्या परवानगीने वार्षिक पद्धतीकरिता (Annual Pattern) व सत्र पद्धतीकरिता (Semester Pattern) **दिनांक ६ सप्टेंबर, २०१८** पर्यंत प्रवेश घेण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

परंतु शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे, यांचे दि.५.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये चालू शैक्षणिक वर्षात उच्च शिक्षणाच्या विविध पारंपारिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेशप्रक्रिया राबवितांना इ. १२ वी फेरपरिक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रिक्त असलेल्या जागांवर नियमानुसार सामावून घेण्याची कार्यवाही करण्याबाबत विद्यापीठ स्तरावरुन सर्व संलग्नित महाविद्यालयांना सुचीत करण्यात यावे असे निर्देश विद्यापीठाला प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करुन व शासनाचे धोरण लक्षात घेवून मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या परवानगीनुसार सत्र २०१८ – १९ करिता प्रवेशाची मुदतवाढ **दिनांक २५, सप्टेंबर, २०१८ पर्यत** देण्यात आली आहे. हि मुदतवाढ पदवी व पद्व्युत्तर तसेच पुर्नमुल्यांकन मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा लागू राहील.

ज्या अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाच्या केंद्रिय प्रवेश समितीद्वारे केले जातात त्यांना सदर मुदतवाढ लागू राहणार नाही. तसेच निर्धारित प्रवेश क्षमतेतील रिक्त जागी प्रवेश देण्यासाठी ही मुदतवाढ करण्यात आली असून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार ९०/१८० शैक्षणिक दिवसात अभ्यासक्रम पुर्ण करण्याच्या अटीवर संबंधीत महाविद्यालंयाच्या प्राचार्यांच्या प्रामाणपत्र/ हमीपत्राच्या आधीन राहून सदर मुदतवाढ देण्यात येत आहे. विद्यापीठाचे अध्यादेश/निर्देशातील तरतूदीनुसार प्रवेश पात्रता तपासूनच व प्रवेश क्षमतेतील रिक्त जागी प्रवेश देण्यात यावा. याची कृपया नोंद घ्यावी.

**मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये**

**(डॉ. निरज खटी)**

**कुलसचिव(अति.प्रभार)**

प्रतिलीपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता सादर.

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित व संचालीत महाविद्यालयाचे प्राचार्य
२. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सर्व पद्व्युत्तर शैक्षणिक विभागाचे विभागप्रमुख
३. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे सर्व अधिकारी
४. नागपुरातील सर्व वृत्तपत्राचे संपादक आपणास विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना आपल्या लोकप्रिय दैनिकांत बातमीरुपाने प्रसिध्द करावी.

**(डॉ. अनिल हिरेखन)**

**उपकुलसचिव (विद्या)**